दै. पुण्यनगरी (1) 14/8

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

## सार्वत्रिक निवडणूक –२०१७

## जाहीर सुचना

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या २०१७ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकती व सुचनांचा राज्य निवडणूक आयोगाने काळजीपुर्वक विचार करुन प्रभाग रचनेची अंतिम अधिसुचना शासन राजपत्रात दिनांक १४.०८.२०१७ रोजी राज्य निवडणूक आयोगामार्फत प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदरील अधिसुचना महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय व क्षेत्रिय कार्यालय तसेच महापालिका संकेतस्थळ www.nwcmc.gov.in यावर नागरीकांना पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

ठिकाण : नांदेड
दिनांक :१४.०८.२०१७

**आयुक्त**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

दै. सकाळ (2) 14/8

# प्रभाग रचना, आरक्षणाची आज अंतिम प्रसिध्दी

## नांदेड महापालिका निवडणूक, मतदारयादी १९ ऑगस्टला प्रसिद्ध होणार

**नांदेड, ता. १३ (बातमीदार) :** नांदेड महापालिकेच्या निवडणुकासाठी प्रभाग रचना आणि आरक्षण अंतिम करण्यात आले असून सोमवारी (ता. १४) सकाळी ११ वाजता त्यास अंतिम प्रसिद्धी देऊन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्याचबरोबर येत्या ता. १९ ऑगस्टला प्रभागनिहाय मतदारयादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

नांदेड महापालिकेची येत्या आक्टोंबर महिन्यात निवडणुक होत असून त्यासाठी आयुक्त गणेश देशमुख यांनी अधिकारी, पदाधिकारी व नागरिकांच्या उपस्थितीत ता. सहा जुलै रोजी प्रभाग रचना व आरक्षण सोडत काढली. त्यानंतर नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला गटाच्या आरक्षणातील बदलामुळे पुन्हा त्यासाठी ता. दहा जुले रोजी सोडत काढण्यात आली. त्यानंतर ता. ११ ते ता. १९ जुलैदरम्यान प्रारूप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना मागविण्यात आल्या. त्यावर ता. २८ जुलै रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीनंतरचा अहवाल राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात आला.

हरकती व सूचनांच्या सुनावणीनंतर प्राधिकृत अधिकारी यांनी दिलेल्या अहवालानुसार राज्य निवडणुक आयोगाने काळजीपूर्वक विचार करून अंतिम प्रभाग रचना व आरक्षण सोमवारी (ता. १४) जाहीर करणार आहे. त्याची प्रसिद्धी होऊन ती राजपत्रात प्रसिद्ध केली जाईल त्याचबरोबर इच्छुकांना महापालिकेच्या मुख्य कार्यालयात तसेच स्टेडियम परिसरातील निवडणूक कार्यालयात तसेच चारही क्षेत्रीय कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक विभागातर्फे देण्यात आली. आता प्रभागनिहाय मतदार यादी तयार करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून येत्या ता. १९ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.